RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २७(५)] शुक्रवार, डिसेंबर २६, २०२५/पौष ५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०.**—महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | **पृष्ठे** १ – ३ |


दिनांक २५ डिसेंबर, २०२५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

**सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०२५ चा महा. ४६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम ८ डिसेंबर २०२५ पासून दाखल करण्यात येईल :– २०२५ चा महा. ४६.

"(३) (एक) कलमे १, ३ व ४ ही, हा अधिनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास अंमलात येतील.

(दोन) उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी, वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) उप-खंड (च) मधील, परिच्छेद (आठ) नंतर, पुढील **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईलः–

"**स्पष्टीकरण.–** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, संसदेच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा घटित केलेल्या कोणत्याही निकायाचा किंवा मंडळाचा किंवा महामंडळाचा किंवा प्राधिकरणाचा किंवा कंपनीचा किंवा सोसायटीचा किंवा स्वायत्त संस्थेचा (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) अध्यक्ष किंवा सदस्य अथवा अधिकारी, याचा अर्थ संसदेच्या अधिनियमान्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला केवळ असा अध्यक्ष, सदस्य किंवा व्यक्ती, असा आहे.";

(२) उप-खंड (ज) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २ च्या खंड (ज) अन्वये" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ठ) अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (छ) नंतर, पुढील **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईल :–

"**स्पष्टीकरण.–** या खंडाच्या प्रयोजनांसाठी, संसदेच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही निकायाचे किंवा मंडळाचे किंवा महामंडळाचे किंवा प्राधिकरणाचे किंवा कंपनीचे किंवा सोसायटीचे किंवा विश्वस्त संस्थेचे किंवा स्वायत्त संस्थेचे (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) अधिकारी व कर्मचारी, याचा अर्थ संसदेच्या अधिनियमान्वये राज्य शासनाद्वारे किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी, असा आहे;".

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,–

(१) पोट-कलम (३) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १९३" हा मजकूर दाखल करण्यात येईल; १९७४ चा २. २०२३ चा ४६.

(२) पोट-कलम (४) मधील, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १७३" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १९३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७४ चा २. २०२३ चा ४६.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,–

(१) पोट-कलम (१) मधील, "भारतीय पुरावा अधिनियम, १८७२" या मजकुराऐवजी, "भारतीय साक्षी अधिनियम, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल; १८७२ चा १. २०२३ चा ४७.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. (२) पोट-कलम (२) मधील, खंड (ख) मधील, “भारतीय दंड संहितेखालील” या मजकुराऐवजी, “भारतीय न्याय संहिता, २०२३ खालील” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९७४ चा २. २०२३ चा ४६. **७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (२) मधील, “फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९७” या मजकुराऐवजी, “भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २१८” हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३० ची सुधारणा.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. **८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, “भारतीय दंड संहितेच्या कलम १९३” या मजकुराऐवजी, “भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २२९” हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

१९७४ चा २. २०२३ चा ४६. **९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पोट-कलम (३) मधील, “फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९९ ची पोट-कलमे (२) ते (५)” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “अपराधांच्या संबंधात लागू होतील” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल:- सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ५० ची सुधारणा.

“भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम २२२ ची पोट-कलमे (२) ते (५) च्या तरतुदी, त्या ज्याप्रमाणे उक्त कलम २२२ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे त्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खालील अपराधांच्या संबंधात लागू होतील.”.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. **१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मधील, “भारतीय दंड संहितेच्या कलम २१” या मजकुराऐवजी, “भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (२८)” हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. **११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये, खंड (क) मधील, “भारतीय दंड संहितेच्या कलम १९” या मजकुराऐवजी, “भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (१६)” हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.